
14 MAR 2024

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# रंगीबेरंगी फुलपाखरांसह काटीकिडे, नाकतोडेही

## विद्यापीठात प्रदर्शन : दोन हजारांहून अधिक कीटक पाहून प्रेक्षक भारावले



पतंगवर्गीय कीटक

### अनोखे प्रदर्शन

पश्चिम महाराष्ट्राच्या घाटात सापडलेले दुर्मीळ आणि विविध जातींचे कीटक पाहून उपस्थित भारावून गेले. सर्वात मोठा पतंग, भारतातील सर्वात मोठे आणि सर्वात लहान फुलपाखरू, ब्लू मॉरमॉन या राज्य फुलपाखरासह सुमारे २ हजारांहून अधिक कीटक प्रदर्शनात आहेत.

### आश्चर्य आणि नवलाई

प्रदर्शन पाहून विद्यार्थ्यांसह नागरिकांच्या आश्चर्य आणि नवलाई ओसंडून वाहिली. प्राणीशास्त्र अधिविभागाने आपल्या संशोधक विद्यार्थी-विद्यार्थिनींनी भेट देणाऱ्यांना माहिती दिली. त्यामुळे किटकांच्या प्रत्येक पॅनलभोवती जिज्ञासूंची गर्दी दिसत होती.



लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : सर्वात मोठा पतंग, भारतातील सर्वात मोठे आणि सर्वात लहान फुलपाखरू तसेच ब्लू मॉरमॉन हे राज्य फुलपाखरू पाहण्याची संधी बुधवारी विद्यार्थी आणि नागरिकांनी अनुभवली.

रंगीबेरंगी फुलपाखरांसह काटीकिडे, टोळ, नाकतोडे, भुंगे, मक्षिका, चतुर, किरकिरे, प्रार्थना कीटक, झुरळ आदी किटकांच्या विविध प्रजाती व प्रकार अनेकांनी कॅमेराबद्ध केले.

शिवाजी विद्यापीठाच्या प्राणीशास्त्र अधिविभागातर्फे विविध संशोधनांतर्गत वेळोवेळी वेगवेगळ्या किटकांच्या प्रजातींचे नमुने वनविभाग आणि महाराष्ट्र जैवविविधता मंडळाच्या सौजन्याने संकलित केले आहे. हे नमुने विद्यार्थ्यांना अभ्यासासाठी उत्तम रीतीने जतन करून ठेवले आहे. यातीलच निवडक २२०० किटकांचे प्रदर्शन भरविण्यात आले.

जैविक अन्नसाखळीमध्ये किटकांचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. या किटकांच्या प्रदर्शनाच्या आयोजनामुळे विद्यापीठाच्या नॉलेज टुरिझममध्ये प्राणीशास्त्र अधिविभागाने महत्त्वाची भर घातली आहे, असे मत कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांनी बुधवारी येथे व्यक्त केले. शिवाजी विद्यापीठाच्या प्राणीशास्त्र अधिविभागातर्फे आयोजित करण्यात आलेल्या तीन दिवसीय कीटक प्रदर्शनाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. १५ मार्चपर्यंत प्रदर्शन सुरू राहणार असून, त्याची सकाळी १० ते सायंकाळी ६ अशी वेळ आहे. यावेळी प्रदर्शनाचे समन्वयक डॉ. सुनील गायकवाड यांनी कुलगुरूंसह मान्यवरांना प्रदर्शनात मांडलेल्या किटकांच्या प्रजातींची तपशीलवार माहिती दिली. यावेळी प्रदर्शनाचे समन्वयक डॉ. सुनील गायकवाड यांनी तपशीलवार माहिती दिली.



अर्धवाल पंखीगण कीटक (बिटल)



खवले पंखी कीटक

14 MAR 2024

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# रंगीबेरंगी फुलपाखरांसह काटीकिडे, नाकतोडेही

## विद्यापीठात प्रदर्शन : दोन हजारांहून अधिक कीटक पाहून प्रेक्षक भारावले



पतंगवर्गीय कीटक

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : सर्वात मोठा पतंग, भारतातील सर्वात मोठे आणि सर्वात लहान फुलपाखरू तसेच ब्लू मॉरमॉन हे राज्य फुलपाखरू पाहण्याची संधी बुधवारी विद्यार्थी आणि नागरिकांनी अनुभवली.

रंगीबेरंगी फुलपाखरांसह काटीकिडे, टोळ, नाकतोडे, भुंगे, मक्षिका, चतुर, किरकिरे, प्रार्थना कीटक, झुरळ आदी किटकांच्या विविध प्रजाती व प्रकार अनेकांनी कॅमेराबद्ध केले.

शिवाजी विद्यापीठाच्या प्राणीशास्त्र अधिविभागातर्फे विविध संशोधनांतर्गत वेळोवेळी वेगवेगळ्या किटकांच्या प्रजातींचे नमुने वनविभाग आणि महाराष्ट्र जैवविविधता मंडळाच्या सौजन्याने संकलित केले आहे. हे नमुने विद्यार्थ्यांना अभ्यासासाठी उत्तम रीतीने जतन करून ठेवले आहे. यातीलच निवडक २२०० किटकांचे प्रदर्शन भरविण्यात आले.

जैविक अन्नसाखळीमध्ये किटकांचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. या किटकांच्या प्रदर्शनाच्या आयोजनामुळे विद्यापीठाच्या नॉलेज टुरिझममध्ये प्राणीशास्त्र अधिविभागाने महत्त्वाची भर घातली आहे, असे मत कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांनी बुधवारी येथे व्यक्त केले. शिवाजी विद्यापीठाच्या प्राणीशास्त्र अधिविभागातर्फे आयोजित करण्यात आलेल्या तीन दिवसीय कीटक प्रदर्शनाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. १५ मार्चपर्यंत प्रदर्शन सुरू राहणार असून, त्याची सकाळी १० ते सायंकाळी ६ अशी वेळ आहे. यावेळी प्रदर्शनाचे समन्वयक डॉ. सुनील गायकवाड यांनी कुलगुरूंसह मान्यवरांना प्रदर्शनात मांडलेल्या किटकांच्या प्रजातींची तपशीलवार माहिती दिली. यावेळी प्रदर्शनाचे समन्वयक डॉ. सुनील गायकवाड यांनी तपशीलवार माहिती दिली.

### अनोखे प्रदर्शन

पश्चिम महाराष्ट्राच्या घाटात सापडलेले दुर्मीळ आणि विविध जातींचे कीटक पाहून उपस्थित भारावून गेले. सर्वात मोठा पतंग, भारतातील सर्वात मोठे आणि सर्वात लहान फुलपाखरू, ब्लू मॉरमॉन या राज्य फुलपाखरासह सुमारे २ हजारांहून अधिक कीटक प्रदर्शनात आहेत.

### आश्चर्य आणि नवलाई

प्रदर्शन पाहून विद्यार्थ्यांसह नागरिकांच्या आश्चर्य आणि नवलाई ओसंडून वाहिली. प्राणीशास्त्र अधिविभागाने आपल्या संशोधक विद्यार्थी-विद्यार्थिनींनी भेट देणाऱ्यांना माहिती दिली. त्यामुळे किटकांच्या प्रत्येक पॅनलभोवती जिज्ञासूंची गर्दी दिसत होती.





अर्धढाल पंखीगण कीटक (बिटल)



खवले पंखी कीटक

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
14 MAR 2024
लोकमत

# राजर्षी शाहू संगीत रजनीचे आज उद्घाटन

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागातर्फे राजर्षी शाहू संगीत रजनी हा संगीत महोत्सव रसिकांच्या भेटीला येत आहे. मान्यवरांच्या हस्ते सायंकाळी साडेपाच वाजता राम गणेश गडकरी सभागृहात हा कार्यक्रम होईल. १४ आणि १५ मार्चपर्यंत हा महोत्सव होत आहे.

शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के यांच्या प्रमुख उपस्थितीत रजनीचा उद्घाटन सोहळा होईल. १४ मार्च रोजी पहिल्या सत्रात पखवाज जुगलबंदी होईल. दुसऱ्या सत्रात गोविंदराव टेंबे यांच्या व्यक्तिमत्त्वाचा शोध घेणारा कार्यक्रम होईल. यामध्ये गौरी कुलकर्णी, गौरी पाटील गिरीधर कुलकर्णी सहभागी होतील.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
14 MAR 2024

लोकमत

# राजर्षी शाहू संगीत रजनीचे आज उद्घाटन

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागातर्फे राजर्षी शाहू संगीत रजनी हा संगीत महोत्सव रसिकांच्या भेटीला येत आहे. मान्यवरांच्या हस्ते सायंकाळी साडेपाच वाजता राम गणेश गडकरी सभागृहात हा कार्यक्रम होईल. १४ आणि १५ मार्चपर्यंत हा महोत्सव होत आहे.

शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के यांच्या प्रमुख उपस्थितीत रजनीचा उद्घाटन सोहळा होईल. १४ मार्च रोजी पहिल्या सत्रात पखवाज जुगलबंदी होईल. दुसऱ्या सत्रात गोविंदराव टेंबे यांच्या व्यक्तिमत्त्वाचा शोध घेणारा कार्यक्रम होईल. यामध्ये गौरी कुलकर्णी, गौरी पाटील गिरीधर कुलकर्णी सहभागी होतील.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
14 MAR 2024

लोकमत

# नाइट कॉलेजचे उद्या पारितोषिक वितरण

कोल्हापूर: नाइट कॉलेज ऑफ आर्टस अँण्ड कॉमर्सचा वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ शुक्रवारी सायंकाळी सहा वाजता होत आहे. शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे प्रमुख पाहुणे आहेत. अध्यक्षस्थानी काऊन्सिल ऑफ एज्युकेशनच्या अध्यक्षा रजनीताई मगदूम आहेत. या कार्यक्रमासाठी उपस्थित राहावे, असे आवाहन प्रभारी प्राचार्य डॉ. एस. जे. फराकटे यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
14 MAR 2024

लोकमत

# नाइट कॉलेजचे उद्या पारितोषिक वितरण

कोल्हापूर: नाइट कॉलेज ऑफ आर्टस अ‍ॅण्ड कॉमर्सचा वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ शुक्रवारी सायंकाळी सहा वाजता होत आहे. शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे प्रमुख पाहुणे आहेत. अध्यक्षस्थानी काउन्सिल ऑफ एज्युकेशनच्या अध्यक्षा रजनीताई मगदूम आहेत. या कार्यक्रमासाठी उपस्थित राहावे, असे आवाहन प्रभारी प्राचार्य डॉ. एस. जे. फराकटे यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
14 MAR 2024

लोकमत

# जे. जे. आर्किटेक्टचरच्या कुलगुरूपदी आर. के. कामत

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : डॉ. होमी भाभा राज्य विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. रजनीश कामत यांची सर जे. जे. स्कूल ऑफ आर्टस् आर्किटेक्टचर अँण्ड डिझाइन मुंबई विद्यापीठाच्या प्रथम कुलगुरूपदाचा कार्यभार आज स्वीकारला. त्याबाबतचा आदेश राज्य सरकारने मंगळवारी काढला होता.

कला वास्तुकला आणि अभिकल्प या विषयाच्या व्यापक शैक्षणिक विकासाकरिता समर्पित असलेल्या देशामधील एकमेव विद्यापीठ आहे. डॉ. आर. के. कामत हे ऑगस्ट २०२२ पासून डॉ. होमी भाभा राज्य विद्यापीठाचे पहिले कुलगुरू म्हणून कार्यरत आहेत. यापूर्वी त्यांनी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या प्रभारी कुलगुरूपदी म्हणून काम पहिले आहे. त्यासह शिवाजी विद्यापीठामध्ये विज्ञान व तंत्रज्ञान विभागाचे अधिष्ठाता म्हणून कार्यरत होते. याशिवाय इलेक्ट्रॉनिक्स आणि संगणक शास्त्र विभागाचे वरिष्ठ प्राध्यापक आणि विभागप्रमुख काम केले. शिवाजी विद्यापीठात भारत सरकारच्या निधीतून सायबर सुरक्षा केंद्र स्थापन केले. त्यासह आयक्यूएसीचे संचालक म्हणून काम करताना नॅक ए प्लस प्लस मिळवण्यात त्यांची प्रमुख भूमिका होती. डॉ. होमी भाभा विद्यापीठाचे महाराष्ट्रातील पहिले समूह विद्यापीठ म्हणून २०१९ मध्ये स्थापना केली होती. त्याचे पहिले नियमित कुलगुरू म्हणून डॉ. कामत यांनी ऑगस्ट २०२२ मध्ये कार्यभार स्वीकारला होता.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
14 MAR 2024
लोकमत

# जे. जे. आर्किटेक्टचरच्या कुलगुरूपदी आर. के. कामत

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : डॉ. होमी भाभा राज्य विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. रजनीश कामत यांची सर जे. जे. स्कूल ऑफ आर्टस् आर्किटेक्टचर अँण्ड डिझाइन मुंबई विद्यापीठाच्या प्रथम कुलगुरूपदाचा कार्यभार आज स्वीकारला. त्याबाबतचा आदेश राज्य सरकारने मंगळवारी काढला होता.

कला वास्तुकला आणि अभिकल्प या विषयाच्या व्यापक शैक्षणिक विकासाकरिता समर्पित असलेल्या देशामधील एकमेव विद्यापीठ आहे. डॉ. आर. के. कामत हे ऑगस्ट २०२२ पासून डॉ. होमी भाभा राज्य विद्यापीठाचे पहिले कुलगुरू म्हणून कार्यरत आहेत. यापूर्वी त्यांनी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या प्रभारी कुलगुरूपदी म्हणून काम पहिले आहे. त्यासह शिवाजी विद्यापीठामध्ये विज्ञान व तंत्रज्ञान विभागाचे अधिष्ठाता म्हणून कार्यरत होते. याशिवाय इलेक्ट्रॉनिक्स आणि संगणक शास्त्र विभागाचे वरिष्ठ प्राध्यापक आणि विभागप्रमुख काम केले. शिवाजी विद्यापीठात भारत सरकारच्या निधीतून सायबर सुरक्षा केंद्र स्थापन केले. त्यासह आयक्यूएसीचे संचालक म्हणून काम करताना नॅक ए प्लस प्लस मिळवण्यात त्यांची प्रमुख भूमिका होती. डॉ. होमी भाभा विद्यापीठाचे महाराष्ट्रातील पहिले समूह विद्यापीठ म्हणून २०१९ मध्ये स्थापना केली होती. त्याचे पहिले नियमित कुलगुरू म्हणून डॉ. कामत यांनी ऑगस्ट २०२२ मध्ये कार्यभार स्वीकारला होता.

जनसंपर्क कक्ष.
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
14 MAR 2024
लोकमत

# डॉ. अर्जुन चव्हाण यांना 'कालिदास सन्मान' जाहीर

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : येथील ज्येष्ठ हिंदी लेखक, समीक्षक व शिवाजी विद्यापीठातील हिंदी विभागाचे माजी विभागप्रमुख



प्रा.डॉ.अर्जुन चव्हाण यांना विश्व हिंदी शोध-संवर्धन अकादमी, बनारसच्या वतीने देण्यात येणारा मानाचा 'कालिदास सन्मान' जाहीर झाला.

काशी हिंदू विद्यापीठ, वाराणसी येथे येत्या रविवारी, १७ मार्चला हा सन्मान प्रदान करण्यात येणार आहे. डॉ.चव्हाण यांनी सामाजिक, साहित्यिक आणि शैक्षणिक क्षेत्रामध्ये दिलेल्या अतुलनीय योगदानाबद्दल त्यांना गौरविण्यात येईल. हिंदी गझल आणि काव्याच्या क्षेत्रात त्यांनी १६ हून अधिक संग्रहांचे लेखन केले आहे. याची दखल घेऊन महाकवी कालिदासांच्या नावे दिला जाणारा हा सन्मान जाहीर केला आहे.

हिंदी साहित्य क्षेत्रामध्ये डॉ.चव्हाण यांचे योगदान मोलाचे आहे. त्यांची हिंदीमध्ये आतापर्यंत ६० हून अधिक समीक्षात्मक, सृजनात्मक, अनुवादित, संपादित पुस्तके प्रकाशित आहेत. साहित्य क्षेत्रातील त्यांच्या या योगदानाबद्दल त्यांना यापूर्वी साहित्य शिरोमणी मॉरिशस सन्मान, हिंदी साहित्य अकादमी मॉरिशस सन्मान, हिंदी साहित्य अकादमीचा पंडित महावीर प्रसाद द्विवेदी पुरस्कार, सुब्रह्मण्य भारती साहित्य सेतू जीवन गौरव पुरस्कार, 'हिंदी भूषण' पुरस्कार अशा पुरस्कारांनी गौरविले आहे.

जनसंपर्क कक्ष.
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
14 MAR 2024
लोकमत

# डॉ. अर्जुन चव्हाण यांना 'कालिदास सन्मान' जाहीर

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : येथील ज्येष्ठ हिंदी लेखक, समीक्षक व शिवाजी विद्यापीठातील हिंदी विभागाचे माजी विभागप्रमुख



प्रा.डॉ.अर्जुन चव्हाण यांना विश्व हिंदी शोध-संवर्धन अकादमी, बनारसच्या वतीने देण्यात येणारा मानाचा 'कालिदास सन्मान' जाहीर झाला.

काशी हिंदू विद्यापीठ, वाराणसी येथे येत्या रविवारी, १७ मार्चला हा सन्मान प्रदान करण्यात येणार आहे. डॉ.चव्हाण यांनी सामाजिक, साहित्यिक आणि शैक्षणिक क्षेत्रामध्ये दिलेल्या अतुलनीय योगदानाबद्दल त्यांना गौरविण्यात येईल. हिंदी गझल आणि काव्याच्या क्षेत्रात त्यांनी १६ हून अधिक संग्रहांचे लेखन केले आहे. याची दखल घेऊन महाकवी कालिदासांच्या नावे दिला जाणारा हा सन्मान जाहीर केला आहे.

हिंदी साहित्य क्षेत्रामध्ये डॉ.चव्हाण यांचे योगदान मोलाचे आहे. त्यांची हिंदीमध्ये आतापर्यंत ६० हून अधिक समीक्षात्मक, सृजनात्मक, अनुवादित, संपादित पुस्तके प्रकाशित आहेत. साहित्य क्षेत्रातील त्यांच्या या योगदानाबद्दल त्यांना यापूर्वी साहित्य शिरोमणी मॉरिशस सन्मान, हिंदी साहित्य अकादमी मॉरिशस सन्मान, हिंदी साहित्य अकादमीचा पंडित महावीर प्रसाद द्विवेदी पुरस्कार, सुब्रह्मण्य भारती साहित्य सेतू जीवन गौरव पुरस्कार, 'हिंदी भूषण' पुरस्कार अशा पुरस्कारांनी गौरविले आहे.

14 MAR 2024 लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



शिरसंगी ( ता. आजरा ) येथील २५० वर्षांपूर्वीचा हाच तो महाकाय वटवृक्ष.

# २५० वर्षांपूर्वीच्या शिरसंगीमधील वटवृक्षाची पुरातत्त्व वनस्पतीत नोंद

## अमेरिका, कॅनडा व मुंबईतील पुरातत्त्व अभ्यासकांची भेट

लोकमत न्यूज नेटवर्क

आजरा : शिरसंगी (ता. आजरा) येथील २५० वर्षांपूर्वीच्या वटवृक्षाला अमेरिका, कॅनडा व मुंबई येथील पुरातत्त्व वनस्पतींच्या अभ्यासकांनी भेट दिली. शिरसंगीच्या वटवृक्षाचे वय, पुरातत्त्वता व अन्य कसोट्या पाहता या वटवृक्षाची पुरातत्त्व वनस्पतीमध्ये नोंद होणार असल्याची माहिती अमेरिकेतील मॅनेजिंग डायरेक्टर जेरेमी बेरेल व कॅनडाचे प्राचार्य फिलिप व्हॅन बॅसनर यांनी दिली.

शिरसंगी येथील महाकाय वटवृक्ष दीड एकरमध्ये विस्तीर्ण असा पसरलेला आहे. या ठिकाणी गोठण देव असून हा वटवृक्ष २५० वर्षांपूर्वीचा असल्याचे गावातील प्रतिष्ठित नागरिक सी. आर. देसाई, बाबूराव बुडके, भैरू टक्केकर, सरपंच संदीप चौगुले, उपसरपंच पांडुरंग टक्केकर यांनी सांगितले. या वटवृक्षाची व गोठणदेवाची आख्यायिका अभिजित टक्केकर यांनी दिली.

महाकाय वटवृक्ष व परिसरातील अन्य वृक्षांची शास्त्रीय व औषधी गुणधर्माची माहिती परदेशी पाहुण्यांना आजरा महाविद्यालयातील वनस्पतीशास्त्र विभागाचे प्रमुख डॉ. तानाजी कावळे यांनी दिली.

वटवृक्षाची नोंद पुरातत्त्व वनस्पतीमध्ये होणार असल्याचे मॅनेजिंग डायरेक्टर जेरेमी बेरेल व प्राचार्य फिलिप बसणार शिवाजी विद्यापीठाचे उद्यान अधीक्षक अभिजित जाधव अमिनती केअर असोसिएशन मुंबईचे संचालक वैभव राजे यांनी दिली.

परदेशी पाहुण्यांचे स्वागत फेटा, शाल, हारतुरे, श्रीफळ देऊन करण्यात आले. यावेळी ग्रामपंचायत सदस्य सुमन होडगे, सरिता कुंभार, संतोष चौगुले, सर्जेराव कांबळे, सरपंच संघटनेचे जिल्हाध्यक्ष जी. एम. पाटील, सरचिटणीस राजू पोतनीस यासह ग्रामस्थ उपस्थित होते.

14 MAR 2024 लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



शिरसंगी ( ता. आजरा ) येथील २५० वर्षांपूर्वीचा हाच तो महाकाय वटवृक्ष.

# २५० वर्षांपूर्वीच्या शिरसंगीमधील वटवृक्षाची पुरातत्त्व वनस्पतीत नोंद

## अमेरिका, कॅनडा व मुंबईतील पुरातत्त्व अभ्यासकांची भेट

लोकमत न्यूज नेटवर्क

आजरा : शिरसंगी (ता. आजरा) येथील २५० वर्षांपूर्वीच्या वटवृक्षाला अमेरिका, कॅनडा व मुंबई येथील पुरातत्त्व वनस्पतींच्या अभ्यासकांनी भेट दिली. शिरसंगीच्या वटवृक्षाचे वय, पुरातत्त्वता व अन्य कसोट्या पाहता या वटवृक्षाची पुरातत्त्व वनस्पतीमध्ये नोंद होणार असल्याची माहिती अमेरिकेतील मॅनेजिंग डायरेक्टर जेरेमी बेरेल व कॅनडाचे प्राचार्य फिलिप व्हॅन बॅसनर यांनी दिली.

शिरसंगी येथील महाकाय वटवृक्ष दीड एकरमध्ये विस्तीर्ण असा पसरलेला आहे. या ठिकाणी गोठण देव असून हा वटवृक्ष २५० वर्षांपूर्वीचा असल्याचे गावातील प्रतिष्ठित नागरिक सी. आर. देसाई, बाबूराव बुडके, भैरू टक्केकर, सरपंच संदीप चौगुले, उपसरपंच पांडुरंग टक्केकर यांनी सांगितले. या वटवृक्षाची व गोठणदेवाची आख्यायिका अभिजित टक्केकर यांनी दिली.

महाकाय वटवृक्ष व परिसरातील अन्य वृक्षांची शास्त्रीय व औषधी गुणधर्मांची माहिती परदेशी पाहुण्यांना आजरा महाविद्यालयातील वनस्पतीशास्त्र विभागाचे प्रमुख डॉ. तानाजी कावळे यांनी दिली.

वटवृक्षाची नोंद पुरातत्त्व वनस्पतीमध्ये होणार असल्याचे मॅनेजिंग डायरेक्टर जेरेमी बेरेल व प्राचार्य फिलिप बसणार शिवाजी विद्यापीठाचे उद्यान अधीक्षक अभिजित जाधव अमिनती केअर असोसिएशन मुंबईचे संचालक वैभव राजे यांनी दिली.

परदेशी पाहुण्यांचे स्वागत फेटा, शाल, हारतुरे, श्रीफळ देऊन करण्यात आले. यावेळी ग्रामपंचायत सदस्य सुमन होडगे, सरिता कुंभार, संतोष चौगुले, सर्जेराव कांबळे, सरपंच संघटनेचे जिल्हाध्यक्ष जी. एम. पाटील, सरचिटणीस राजू पोतनीस यासह ग्रामस्थ उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
14 MAR 2024
लोकमत

Estd. 1962
"A++" Accredited
by NAAC (2021)
with CGPA 3.52

# SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

## E-Tender Notice No. 957

Shivaji University invites online tenders of **Supply of Masking Labels.** Relevant tender documents are available on web-site **"http://unishivaji.sets.co.in."** Interested parties should submit online tenders accordingly by getting their firm's name registered with above said URL. University reserve Right of Negotiation and also to accept or reject any or all tenders without assigning any reason. **Last date of tender submission dt. 27/03/2024 upto 5-00 p.m.**

SU/Stores
Date : **14/03/2024**

**Dr. V. N. Shinde**
Registrar

जनसंपर्क कक्ष
14 MAR 2024
पुढारी
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# जैविक अन्नसाखळीमध्ये कीटकांचे महत्त्व अनन्यसाधारण : डॉ. शिर्के

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

जैविक अन्नसाखळीमध्ये कीटकांचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. या कीटकांच्या प्रदर्शनाच्या आयोजनामुळे विद्यापीठाच्या नॉलेज टुरिझममध्ये प्राणीशास्त्र अधिविभागाने महत्त्वाची भर घातली आहे, असे मत कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांनी व्यक्त केले. शिवाजी विद्यापीठाच्या प्राणीशास्त्र अधिविभागातर्फे आयोजित तीन दिवसीय भव्य कीटक प्रदर्शनाच्या उद्‌घाटनप्रसंगी ते बोलत होते.

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, पर्यावरणाचा समतोल राखण्यामध्ये कीटक मोलाची भूमिका बजावतात. कीटकांचे अस्तित्व राहिले, तरच मानवाचे अस्तित्व अबाधित राहणार आहे, याची जाणीव करून देणारे हे प्रदर्शन आहे. संशोधक, विद्यार्थी यांच्यासह शालेय विद्यार्थी आणि सर्वसामान्य नागरिक यांच्यापर्यंत हा मोलाचा संदेश घेऊन जाण्याच्या दृष्टीने हे प्रदर्शन महत्त्वाची भूमिका बजावेल.



कोल्हापूर : विद्यापीठात आयोजित कीटक प्रदर्शनाचे उद्‌घाटन करताना कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, कुलसचिव डॉ. विलास शिंदे, डॉ. श्रीकृष्ण महाजन, डॉ. सुनील गायकवाड.

प्रदर्शनाचे समन्वयक डॉ. सुनील गायकवाड यांनी पृथ्वीवरील एकूण प्राणिमात्रांमध्ये कीटकांचे प्रमाण ८० टक्क्यांहून अधिक आहे. कीटकांच्या अंदाजे एक कोटी प्रजाती असून त्यातील अवघ्या दहा लाखच मानवाला माहिती आहेत. एका माणसामागे २०० दशलक्ष कीटक असे त्यांच्या संख्येचे प्रमाण आहे.

यावेळी प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, कुलसचिव डॉ. विलास शिंदे, डॉ. श्रीकृष्ण महाजन, डॉ. महादेव देशमुख, डॉ. एस. बी. खरबडे, व्यवस्थापन परिषदेचे सदस्य सिद्धार्थ शिंदे, डॉ. सागर डेळेकर, डॉ. नितीन कांबळे, डॉ. शिवानंद यन्कंची, डॉ. माधव भिलावे आदी उपस्थित होते.

14 MAR 2024
पुढारी

# जैविक अन्नसाखळीमध्ये कीटकांचे महत्त्व अनन्यसाधारण : डॉ. शिर्के

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

जैविक अन्नसाखळीमध्ये कीटकांचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. या कीटकांच्या प्रदर्शनाच्या आयोजनामुळे विद्यापीठाच्या नॉलेज टुरिझममध्ये प्राणीशास्त्र अधिविभागाने महत्त्वाची भर घातली आहे, असे मत कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांनी व्यक्त केले. शिवाजी विद्यापीठाच्या प्राणीशास्त्र अधिविभागातर्फे आयोजित तीन दिवसीय भव्य कीटक प्रदर्शनाच्या उद्‌घाटनप्रसंगी ते बोलत होते.

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, पर्यावरणाचा समतोल राखण्यामध्ये कीटक मोलाची भूमिका बजावतात. कीटकांचे अस्तित्व राहिले, तरच मानवाचे अस्तित्व अबाधित राहणार आहे, याची जाणीव करून देणारे हे प्रदर्शन आहे. संशोधक, विद्यार्थी यांच्यासह शालेय विद्यार्थी आणि सर्वसामान्य नागरिक यांच्यापर्यंत हा मोलाचा संदेश घेऊन जाण्याच्या दृष्टीने हे प्रदर्शन महत्त्वाची भूमिका बजावेल.



कोल्हापूर : विद्यापीठात आयोजित कीटक प्रदर्शनाचे उद्‌घाटन करताना कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, कुलसचिव डॉ. विलास शिंदे, डॉ. श्रीकृष्ण महाजन, डॉ. सुनील गायकवाड.

प्रदर्शनाचे समन्वयक डॉ. सुनील गायकवाड यांनी पृथ्वीवरील एकूण प्राणिमात्रांमध्ये कीटकांचे प्रमाण ८० टक्क्यांहून अधिक आहे. कीटकांच्या अंदाजे एक कोटी प्रजाती असून त्यातील अवघ्या दहा लाखच मानवाला माहिती आहेत. एका माणसामागे २०० दशलक्ष कीटक असे त्यांच्या संख्येचे प्रमाण आहे.

यावेळी प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, कुलसचिव डॉ. विलास शिंदे, डॉ. श्रीकृष्ण महाजन, डॉ. महादेव देशमुख, डॉ. एस. बी. खरबडे, व्यवस्थापन परिषदेचे सदस्य सिद्धार्थ शिंदे, डॉ. सागर डेळेकर, डॉ. नितीन कांबळे, डॉ. शिवानंद यन्कंची, डॉ. माधव भिलावे आदी उपस्थित होते.

14 MAR 2024
पुढारी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

# 'कीटक' प्रदर्शन...

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ प्राणीशास्त्र अधिविभागातर्फे कीटकांच्या प्रजातींचे नमुने विद्यार्थ्यांना अभ्यासासाठी जतन करून ठेवले आहेत. यातीलच निवडक २२०० कीटकांचे प्रदर्शन भरविले आहे. कीटकांच्या विविध प्रजाती, सर्वात मोठा पतंग, सर्वात मोठे आणि सर्वात लहान फुलपाखरू तसेच ब्लू मॉरमॉन हे राज्य फुलपाखरू पाहण्याची संधीही मिळणार आहे. (छाया : अर्जून टाकळकर)


पतंग फुलपाखरू


भीमपंखी फुलपाखरू


खवले पंखीगण


अर्धढाल पंखीगण


टोळ नागतोडा

14 MAR 2024

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 'कीटक' प्रदर्शन...

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ प्राणीशास्त्र अधिविभागातर्फे कीटकांच्या प्रजातींचे नमुने विद्यार्थ्यांना अभ्यासासाठी जतन करून ठेवले आहेत. यातीलच निवडक २२०० कीटकांचे प्रदर्शन भरविले आहे. कीटकांच्या विविध प्रजाती, सर्वात मोठा पतंग, सर्वात मोठे आणि सर्वात लहान फुलपाखरू तसेच ब्लू मॉरमॉन हे राज्य फुलपाखरू पाहण्याची संधीही मिळणार आहे. (छाया : अर्जून टाकळकर)


पतंग फुलपाखरू


भीमपंखी फुलपाखरू


खवले पंखीगण


अर्धढाल पंखीगण


टोळ नागतोडा

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
14 MAR 2024
पुढारी

# शिवाजी विद्यापीठ गुणवत्ता हमी कक्ष संचालकपदी डॉ. सागर डेळेकर

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाच्या संचालकपदी डॉ. सागर डेळेकर यांची म्हणून निवड झाली आहे. विद्यापीठाच्या एकूण अध्यापन,मूल्यमापन, संशोधन विस्तार आणि सल्लामसलत संधीची गुणवत्ता वाढीविण्यावर लक्ष केंद्रित करते, ज्याअंतर्गत गुणवत्ता आणि सतत अपेक्षित बदल सुनिश्चित करून नॅक नामांकन सुधारणा करणे हा या कक्षाचा मुख्य उद्देश आहे. प्रा. डेळेकर सध्या रसायनशास्त्र विभागात प्राध्यापक व संशोधक म्हणून कार्यरत आहेत.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
14 MAR 2024
पुढारी

# शिवाजी विद्यापीठ गुणवत्ता हमी कक्ष संचालकपदी डॉ. सागर डेळेकर

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाच्या संचालकपदी डॉ. सागर डेळेकर यांची म्हणून निवड झाली आहे. विद्यापीठाच्या एकूण अध्यापन,मूल्यमापन, संशोधन विस्तार आणि सल्लामसलत संधीची गुणवत्ता वाढीविण्यावर लक्ष केंद्रित करते, ज्याअंतर्गत गुणवत्ता आणि सतत अपेक्षित बदल सुनिश्चित करून नॅक नामांकन सुधारणा करणे हा या कक्षाचा मुख्य उद्देश आहे. प्रा. डेळेकर सध्या रसायनशास्त्र विभागात प्राध्यापक व संशोधक म्हणून कार्यरत आहेत.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
14 MAR 2024

पुढारी

# सर जे. जे. स्कूल ऑफ आर्ट्सच्या कुलगुरूपदी डॉ. कामत

कोल्हापूर : डॉ. होमी भाभा राज्य विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. रजनीश कामत



यांच्याकडे सर जे. जे. स्कूल ऑफ आर्टस् आर्किटेक्टचर अँड डिझाइनच्या कुलगुरुपदाची अतिरिक्त जबाबदारी देण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. सर जे. जेच स्कुल ऑफ आर्ट्सचे विद्यापीठामध्ये रूपांतर करण्याचा प्रस्ताव विद्यापीठ अनुदान आयोगाने गेल्या वर्षी मान्य केला आहे. डॉ. आर. के. कामत हे ऑगस्ट २०२२ पासून भाभा विद्यापीठाचे पहिले कुलगुरू म्हणून कार्यरत आहेत. यापूर्वी त्यांनी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या प्रभारी कुलगुरूपदी म्हणून काम पाहिले आहे. ते शिवाजी विद्यापीठामध्ये विज्ञान व तंत्रज्ञान विभागाचे अधिष्ठाता म्हणून कार्यरत होते. इलेक्ट्रॉनिक्स आणि संगणक शास्त्र विभागाचे वरिष्ठ प्राध्यापक आणि विभागप्रमुख म्हणूनही त्यांनी काम केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
14 MAR 2024
पुढारी

# सर जे. जे. स्कूल ऑफ आर्ट्सच्या कुलगुरूपदी डॉ. कामत

कोल्हापूर : डॉ. होमी भाभा राज्य विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. रजनीश कामत



यांच्याकडे सर जे. जे. स्कूल ऑफ आर्टस् आर्किटेक्टचर अँड डिझाइनच्या कुलगुरुपदाची अतिरिक्त जबाबदारी देण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. सर जे. जेच स्कुल ऑफ आर्ट्सचे विद्यापीठामध्ये रूपांतर करण्याचा प्रस्ताव विद्यापीठ अनुदान आयोगाने गेल्या वर्षी मान्य केला आहे. डॉ. आर. के. कामत हे ऑगस्ट २०२२ पासून भाभा विद्यापीठाचे पहिले कुलगुरू म्हणून कार्यरत आहेत. यापूर्वी त्यांनी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या प्रभारी कुलगुरूपदी म्हणून काम पाहिले आहे. ते शिवाजी विद्यापीठामध्ये विज्ञान व तंत्रज्ञान विभागाचे अधिष्ठाता म्हणून कार्यरत होते. इलेक्ट्रॉनिक्स आणि संगणक शास्त्र विभागाचे वरिष्ठ प्राध्यापक आणि विभागप्रमुख म्हणूनही त्यांनी काम केले आहे.

1 4 MAR 2024 पुढारी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# भित्तीचित्र स्पर्धेचा निकाल जाहीर

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

स्वच्छ भारत अभियानअंतर्गत शहरात घेतलेल्या भित्तीचित्र स्पर्धेचा निकाल जाहीर करण्यात आला आहे. यामध्ये प्रथम, द्वितीय, तृतीय क्रमांक व ३ उत्तेजनार्थ अशी ६ स्पर्धकांची विजेते निवड करण्यात आली. या स्पर्धेमध्ये १९ स्पर्धकांनी सहभाग नोंदविला होता.

के. एस. बी. पी. चौक ते सायबर चौक या रोडवरील शिवाजी विद्यापीठ कंपाऊंड वॉलवर पर्यावरण संवर्धन, राष्ट्रीय स्वच्छ हवा कार्यक्रम, प्लास्टिकबंदी, ३ R Reducing, reusing & recycle waste, क्रीडाविषयक जनजागृती, कोल्हापूरमधील प्रेक्षणीय स्थळे या विषयावर भित्तीचित्र स्पर्धा झाली. यामध्ये प्रथम क्रमांक राकेश दड्डगवार (बक्षीस - रु.२५,०००/- व प्रशस्तीपत्र), द्वितीय क्रमांक अनिल कांबळे (बक्षीस - रु. २०,०००/- व प्रशस्तीपत्र), तृतीय क्रमांक योगेश यशवंत मोरे (बक्षीस - रु. १५,०००/- व प्रशस्तीपत्र), उत्तेजनार्थ पुष्कराज मेस्त्री, पुष्पक पुजारी पांढरबळे व राजेंद्र लोहार यांना बक्षीस व प्रशस्तीपत्र देण्यात येणार आहेत.

या वॉल पेंटिंगचे मूल्यांकनासाठी सहा. आयुक्त संजय सरनाईक, कोल्हापूर प्रेस क्लबचे अध्यक्ष शीतल धनवडे व कला शिक्षक नागेश हंकारे, गजानन धुमाळ व प्रशांत जाधव अशा ५ जणांची समिती केली होती.

14 MAR 2024 पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# भित्तीचित्र स्पर्धेचा निकाल जाहीर

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

स्वच्छ भारत अभियानअंतर्गत शहरात घेतलेल्या भित्तीचित्र स्पर्धेचा निकाल जाहीर करण्यात आला आहे. यामध्ये प्रथम, द्वितीय, तृतीय क्रमांक व ३ उत्तेजनार्थ अशी ६ स्पर्धकांची विजेते निवड करण्यात आली. या स्पर्धेमध्ये १९ स्पर्धकांनी सहभाग नोंदविला होता.

के. एस. बी. पी. चौक ते सायबर चौक या रोडवरील शिवाजी विद्यापीठ कंपाऊंड वॉलवर पर्यावरण संवर्धन, राष्ट्रीय स्वच्छ हवा कार्यक्रम, प्लास्टिक बंदी, ३ R Reducing, reusing & recycle waste, क्रीडाविषयक जनजागृती, कोल्हापूरमधील प्रेक्षणीय स्थळे या विषयावर भित्तीचित्र स्पर्धा झाली. यामध्ये प्रथम क्रमांक राकेश दड्डगवार (बक्षीस - रु.२५,०००/- व प्रशस्तीपत्र), द्वितीय क्रमांक अनिल कांबळे (बक्षीस - रु. २०,०००/- व प्रशस्तीपत्र), तृतीय क्रमांक योगेश यशवंत मोरे (बक्षीस - रु. १५,०००/- व प्रशस्तीपत्र), उत्तेजनार्थ पुष्कराज मेस्त्री, पुष्पक पुजारी पांढरबळे व राजेंद्र लोहार यांना बक्षीस व प्रशस्तीपत्र देण्यात येणार आहेत.

या वॉल पेंटिंगचे मूल्यांकनासाठी सहा. आयुक्त संजय सरनाईक, कोल्हापूर प्रेस क्लबचे अध्यक्ष शीतल धनवडे व कला शिक्षक नागेश हंकारे, गजानन धुमाळ व प्रशांत जाधव अशा ५ जणांची समिती केली होती.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
14 MAR 2024
पुढारी

Estd 1962
"A++" Accredited by
NAAC(2021) WITH
CGPA3.52

## SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR

**E-Tender Notice No. 957**

Shivaji University invites online tenders of **Supply of Masking Labels.** Relevant tender documents are available on web-site **"http://unishivaji.sets.co.in."** Interested parties should submit online tenders accordingly by getting their firm's name registered with above said URL. University reserve Right of Negotiation and also to accept or reject any or all tenders without assigning any reason. **Last date of tender submission dt. 27 /03 /2024 upto 5-00 p.m.**

SU/Stores
Date-14/03/2024

**Dr. V. N. Shinde**
Registrar

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
14 MAR 2024

पुण्यनगरी

# विद्यापीठातील 'आयक्यूएसी'च्या संचालकपदी डॉ. डेळेकर

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाच्या (आयक्यूएसी) संचालकपदी डॉ. सागर डेळेकर यांची निवड झाली आहे. अध्यापन, मूल्यमापन, संशोधन विस्तार आणि सल्ला-मसलत संधीची गुणवत्ता वाढवण्यावर लक्ष केंद्रित करतो, ज्या अंतर्गत गुणवत्ता आणि सतत अपेक्षित बदल सुनिश्चित करून एटीएएल रँकिंग, एनआयआरएफ रँकिंग, नॅक नामांकन इत्यादीमध्ये सुधारणा करणे हा या कक्षाचा मुख्य उद्देश आहे. प्रा. डेळेकर हे रसायनशास्त्र विभागात गेले २२ वर्षे प्राध्यापक व संशोधक म्हणून कार्यरत आहेत. या कक्षाअंतर्गत विद्यापीठाच्या कार्यक्षमतेमध्ये गुणवत्ता आणि सतत सुधारणा सुनिश्चित केली जाईल, अशी ग्वाही डॉ. डेळेकर यांनी दिली. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र- कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे आदींनी डॉ. डेळेकर यांना शुभेच्छा दिल्या.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
1 4 MAR 2024

पुण्यनगरी

# विद्यापीठातील 'आयक्यूएसी'च्या संचालकपदी डॉ. डेळेकर

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाच्या (आयक्यूएसी) संचालकपदी डॉ. सागर डेळेकर यांची निवड झाली आहे. अध्यापन, मूल्यमापन, संशोधन विस्तार आणि सल्ला-मसलत संधीची गुणवत्ता वाढवण्यावर लक्ष केंद्रित करतो, ज्या अंतर्गत गुणवत्ता आणि सतत अपेक्षित बदल सुनिश्चित करून एटीएएल रँकिंग, एनआयआरएफ रँकिंग, नॅक नामांकन इत्यादीमध्ये सुधारणा करणे हा या कक्षाचा मुख्य उद्देश आहे. प्रा. डेळेकर हे रसायनशास्त्र विभागात गेले २२ वर्षे प्राध्यापक व संशोधक म्हणून कार्यरत आहेत. या कक्षाअंतर्गत विद्यापीठाच्या कार्यक्षमतेमध्ये गुणवत्ता आणि सतत सुधारणा सुनिश्चित केली जाईल, अशी ग्वाही डॉ. डेळेकर यांनी दिली. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र- कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे आदींनी डॉ. डेळेकर यांना शुभेच्छा दिल्या.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
14 MAR 2024

पुण्यनगरी



# सिरसंगीतील वटवृक्षाची पुरातन म्हणून नोंद होणार

**आजरा :** सिरसंगी, ता. आजरा येथील 'गोठणदेव' या महाकाय वटवृक्षाची आता जागतिक पातळीवर पुरातन वनस्पतीमध्ये नोंद होणार आहे. मंगळवारी जागतिक अभ्यासकांकडून त्याची पाहणी केली.

जागतिक वृक्ष अभ्यासक जेरेमी बरेल (इंग्लंड) तसेच कॅनडातील अर्बन फॉरेस्ट सोल्युशनचे संचालक फिलिफ व्हॅन वासेंजर यांनी भेट दिली. यावेळी त्यांनी वटवृक्षाची पाहणी करत नोंदी घेतल्या. महाकाय वृक्षाचे वय, प्राचीनत्व व विस्तार या तीन कसोटीमध्ये हा वृक्ष उतरत असल्याने वटवृक्षाची आता जागतिक पातळीवर पुरातन वनस्पतीमध्ये नोंद होणार आहे. या वृक्षाचे संवर्धन व जतन कसे करता येईल, याबाबतही आलेल्या अभ्यासकांनी मार्गदर्शन केले.

सिरसंगी येथील गोठणदेवमधील देवराईतील हा वटवृक्ष दोन एकरमध्ये पसरला आहे. या ठिकाणी शेकडो पर्यटक, भाविक, वृक्षप्रेमी येत असतात. या वृक्षांचे वय अडीचशे ते तीनशे वर्षे असल्याचे ग्रामस्थ सांगतात. या वृक्षाच्या परिसरात विविध पक्षांसह मधमाशा, बारा प्रकारच्या मुंग्या, राज्य पक्षी हरियाल यासह जैवविविधता आढळते.

यावेळी वृक्ष संगोपन समिती, मुंबईचे संचालक वैभव राजे, शिवाजी विद्यापीठ उद्यान विभागाचे अधीक्षक अभिजित जाधव आजरा महाविद्यालयातील वनस्पतीशास्त्र विभागप्रमुख प्रा. तानाजी कावळे, सरपंच संघटनेचे जिल्हाध्यक्ष जी. एम. पाटील, सरपंच संदीप चौगुले समवेत होते. पर्यावरणप्रेमी सी. आर. देसाई यांनी स्वागत केले. पाहुण्यांचा भारतीय परंपरेनुसार सत्कार करण्यात आला. उपसरपंच पांडुरंग टकेकर, ग्रामसेवक मुरलीधर कुंभार, बाबूराव बुडके, नारायण साटपे, संतोष चौगुले, सर्जेराव कांबळे, गंगाराम सुतार, दत्तात्रय होडगे, बाणू बुडके, सरिता कुंभार, सुमन होडगे आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
14 MAR 2024
पुण्यनगरी



# सिरसंगीतील वटवृक्षाची पुरातन म्हणून नोंद होणार

**आजरा :** सिरसंगी, ता. आजरा येथील 'गोठणदेव' या महाकाय वटवृक्षाची आता जागतिक पातळीवर पुरातन वनस्पतीमध्ये नोंद होणार आहे. मंगळवारी जागतिक अभ्यासकांकडून त्याची पाहणी केली.

जागतिक वृक्ष अभ्यासक जेरेमी बरेल (इंग्लंड) तसेच कॅनडातील अर्बन फॉरेस्ट सोल्युशनचे संचालक फिलिफ व्हॅन वासेंजर यांनी भेट दिली. यावेळी त्यांनी वटवृक्षाची पाहणी करत नोंदी घेतल्या. महाकाय वृक्षाचे वय, प्राचीनत्व व विस्तार या तीन कसोटीमध्ये हा वृक्ष उतरत असल्याने वटवृक्षाची आता जागतिक पातळीवर पुरातन वनस्पतीमध्ये नोंद होणार आहे. या वृक्षाचे संवर्धन व जतन कसे करता येईल, याबाबतही आलेल्या अभ्यासकांनी मार्गदर्शन केले.

सिरसंगी येथील गोठणदेवमधील देवराईतील हा वटवृक्ष दोन एकरमध्ये पसरला आहे. या ठिकाणी शेकडो पर्यटक, भाविक, वृक्षप्रेमी येत असतात. या वृक्षांचे वय अडीचशे ते तीनशे वर्षे असल्याचे ग्रामस्थ सांगतात. या वृक्षाच्या परिसरात विविध पक्षांसह मधमाशा, बारा प्रकारच्या मुंग्या, राज्य पक्षी हरियाल यासह जैवविविधता आढळते.

यावेळी वृक्ष संगोपन समिती, मुंबईचे संचालक वैभव राजे, शिवाजी विद्यापीठ उद्यान विभागाचे अधीक्षक अभिजित जाधव आजरा महाविद्यालयातील वनस्पतीशास्त्र विभागप्रमुख प्रा. तानाजी कावळे, सरपंच संघटनेचे जिल्हाध्यक्ष जी. एम. पाटील, सरपंच संदीप चौगुले समवेत होते. पर्यावरणप्रेमी सी. आर. देसाई यांनी स्वागत केले. पाहुण्यांचा भारतीय परंपरेनुसार सत्कार करण्यात आला. उपसरपंच पांडुरंग टकेकर, ग्रामसेवक मुरलीधर कुंभार, बाबूराव बुडके, नारायण साटपे, संतोष चौगुले, सर्जेराव कांबळे, गंगाराम सुतार, दत्तात्रय होडगे, बाणू बुडके, सरिता कुंभार, सुमन होडगे आदी उपस्थित होते.

14 MAR 2024

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर"

# अन्नसाखळीमध्ये कीटकांचे महत्त्व अनन्यसाधारण

## कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के : कीटक प्रदर्शनाचे विद्यापीठात उद्घाटन

कोल्हापूर : प्रतिनिधी

जैविक अन्नसाखळीमध्ये कीटकांचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. या कीटकांच्या प्रदर्शनाच्या आयोजनामुळे विद्यापीठाच्या नॉलेज टुरिझममध्ये प्राणिशास्त्र अधिविभागाने महत्त्वाची भर घातली आहे, असे मत कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांनी व्यक्त केले. शिवाजी विद्यापीठाच्या प्राणिशास्त्र अधिविभागातर्फे आयोजित तीनदिवसीय कीटक प्रदर्शनाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते.

प्राणिशास्त्र अधिविभागातर्फे विविध संशोधनांतर्गत वेळोवेळी कीटकांच्या प्रजातींचे नमुने संकलित करण्यात आले आहेत. हे नमुने अभ्यासासाठी जतन केले आहेत. बातीलच निवडक २२०० कीटकांचे प्रदर्शन भरवण्यात आले आहे. यामध्ये रंगीबेरंगी फुलपाखरांसह काटीकिडे, टोळ, नाकतोडे, भुंगे, मक्षिका, चतुर, किरकिरे, प्रार्थना कीटक, झुरळ आदी कीटकांच्या विविध प्रजाती व प्रकार पाहता येणार आहेत. त्याखेरीज सर्वात मोठा पतंग, भारतातील सर्वात मोठे आणि सर्वात लहान फुलपाखरू तसेच ब्ल्यू मॉरमॉन हे राज्य फुलपाखरू पाहण्याची संधीही उपलब्ध झाली आहे.

यावेळी कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, 'जगा आणि जगू द्या' हे तत्त्व कीटकांच्या बाबतीत मानवाने अवलंबले पाहिजे. कीटकांचे अस्तित्व राहिले, तरच मानवाचे अस्तित्व अबाधित राहणार आहे, याची जाणीव करून देणारे हे प्रदर्शन आहे.

यावेळी प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांच्यासह कुलसचिव डॉ. विलास शिंदे, डॉ. श्रीकृष्ण महाजन, डॉ. महादेव देशमुख, डॉ. एस. बी. खरबडे, सिद्धार्थ शिंदे, इनोव्हेशन, डॉ. सागर डेळेकर, डॉ. नितीन कांबळे, डॉ. शिवानंद यन्कंची, डॉ. माधव भिलावे उपस्थित होते. प्रास्ताविक डॉ. माधुरी वाळवेकर यांनी केले, तर अधिविभागप्रमुख डॉ. आशीष देशमुख यांनी आभार मानले.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात आयोजित कीटक प्रदर्शनाची कुतूहलाने पाहणी करणाऱ्या विद्यार्थिनी.

### कीटकांना पाहून आश्चर्य आणि नवलाई

प्रदर्शन पाहताना विद्यार्थ्यांसह नागरिकांतून आश्चर्य आणि नवलाई ओसंडून वाहत होती. माहिती असणाऱ्या मोजक्या कीटकांकडे कौतुकाने पाहताना माहिती नसणाऱ्या कीटकांकडेही चिकित्सक नवलाईच्या दृष्टीने पाहणारे प्रेक्षक दिसून येत होते. प्राणिशास्त्र अधिविभागाने माहिती देण्यासाठी संशोधक विद्यार्थ्यांची नियुक्ती केली होती.

### पृथ्वीवर ८० टक्क्यांहून अधिक कीटक

पृथ्वीवरील एकूण [illegible] कीटकांचे प्रमाण ८० टक्क्यांहून अधिक आहे. कीटकांच्या अंदाजे १ कोटी प्रजाती असून, त्यातील अवघ्या १० लाख मानवाला माहीत आहेत. [illegible] हा सर्वात मोठा कीटक असून, तो या प्रदर्शनात [illegible]. एक मधमाशी एका दिवसात किमान ६००० फुलांना भेट देते. [illegible] दुसऱ्या [illegible] शकतो. [illegible] ठेवण्याची आणि [illegible] करण्याची [illegible] मिलनोपरांत [illegible] अंड्यांसाठी [illegible], अशी माहिती [illegible] डॉ. सुनील गायकवाड यांनी दिली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

14 MAR 2024

सकाळ

# कीटकांना पाहून आश्चर्य, नवलाई

## देशातील सर्वात मोठे, तसेच लहान फुलपाखरू पाहण्याची संधी

■ सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. १३ : शिवाजी विद्यापीठातील प्राणीशास्त्र अधिविभागाने विविध संशोधनांतर्गत वेळोवेळी वेगवेगळ्या कीटकांच्या प्रजातींचे नमुने वन विभाग आणि महाराष्ट्र जैवविविधता मंडळाच्या सौजन्याने संकलित केले आहेत. त्यातील निवडक २२०० कीटकांचे तीनदिवसीय प्रदर्शन विद्यापीठात सुरू झाले. प्रदर्शन पाहताना विद्यार्थ्यांसह नागरिकांत आश्चर्य आणि नवलाई ओसंडून वाहात होती.

या प्रदर्शनाचे उद्घाटन कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते झाले. जैविक अन्नसाखळीमध्ये कीटकांचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. या कीटकांच्या प्रदर्शनाच्या आयोजनामुळे विद्यापीठाच्या नॉलेज टुरिझममध्ये प्राणीशास्त्र अधिविभागाने महत्त्वाची भर घातली आहे, असे त्यांनी व्यक्त केले. प्रदर्शनात रंगीबेरंगी फुलपाखरांसह काटीकीडे, टोळ, नाकतोडे, भुंगे, मक्षिका, चतुर, किरकिरे, प्रार्थना कीटक, झुरळ आदी कीटकांच्या विविध प्रजाती व प्रकार आहेत. त्याखेरीज सर्वात मोठा पतंग, भारतातील सर्वात मोठे आणि सर्वात लहान फुलपाखरू तसेच 'ब्लू मॉरमॉन' हे राज्य फुलपाखरू आहेत.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात आयोजित कीटक प्रदर्शनाची डॉ. सुनील गायकवाड यांच्याकडून माहिती घेताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्यासह मान्यवर.

प्राणीशास्त्र अधिविभागाने आपल्या संशोधक विद्यार्थी-विद्यार्थिनींची माहिती देण्यासाठी नियुक्ती केली होती. माधुरी वाळवेकर यांनी प्रास्ताविक केले. अधिविभागप्रमुख डॉ. आशिष देशमुख यांनी आभार मानले.

**'मधमाशी संपल्यास माणूस केवळ चार वर्षे जगेल'**

'आईनस्टाईन यांनी म्हटले आहे, 'ज्यावेळी या पृथ्वीवरील अखेरची मधमाशी नाहीशी होईल, तेथून पुढे माणूस केवळ चार वर्षे जगू शकेल.' परागीभवनाच्या प्रक्रियेमुळे अन्ननिर्मितीमध्ये मधमाश्या अत्यंत मोलाची भूमिका बजावतात,' असे प्रदर्शनाचे समन्वयक डॉ. सुनील गायकवाड यांनी सांगितले. पृथ्वीवरील एकूण प्राणीमात्रांमध्ये कीटकांचे प्रमाण ८० टक्क्यांहून अधिक आहे. एटलास मॉथ हा सर्वात मोठा कीटक असून, तो या प्रदर्शनात आहे. एक मधमाशी एका दिवसात किमान १००० फुलांना भेट देते. प्रवासी टोळ हा एका खंडापासून दुसऱ्या खंडापर्यंतचा पल्ला पार करू शकतो. सिकॅडा हा कीटक १७ वर्षांपर्यंत जगू शकतो. कुंभार माशीकडे अन्न जतन करून ठेवण्याची कला असते. प्रार्थना कीटक मीलनोपरांत नरास खाऊन टाकून आपल्या अंड्यांसाठीच्या प्रथिनांची गरज भागविते, असे त्यांनी सांगितले.

जनसंपर्क कक्ष
14 MAR 2024
सकाळ शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात 'बचत गटांकडून स्वयंसहाय्यतेकडे' या विषयावरील कार्यशाळा घेण्यात आली.

# महिलांनी आरोग्याकडे प्राधान्याने लक्ष देणे आवश्यक : कुलगुरू शिर्के

## विद्यापीठात शारदाबाई पवार अध्यासनातर्फे कार्यशाळा

कोल्हापूर, ता. १३ : 'सर्व क्षेत्रांमध्ये महिला अग्रेसर असून, त्यांचे कार्य आदर्शवत आहे. धावपळीच्या जीवनामध्ये वावरताना महिला-भगिनींनी आपल्या आरोग्याकडे प्राधान्याने लक्ष देणे आवश्यक आहे,' असे प्रतिपादन कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले.

शिवाजी विद्यापीठातील श्रीमती शारदाबाई गोविंदराव पवार अध्यासन आणि बेटी बचाओ अभियानातर्फे राजर्षी शाहू सभागृहामध्ये आयोजित 'बचत गटांकडून स्वयंसहाय्यतेकडे' या विषयावरील कार्यशाळेत ते बोलत होते. वित्त व लेखाधिकारी डॉ. सुहासिनी पाटील, वित्त विभागाच्या उपकुलसचिव प्रिया देशमुख, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. पी. टी. गायकवाड, 'माविम'चे जिल्हा समन्वय अधिकारी सचिन कांबळे प्रमुख उपस्थित होते. या अध्यासनाच्या समन्वयक प्रा. डॉ. भारती पाटील यांनी प्रास्ताविक केले.

दरम्यान, या कार्यशाळेत डॉ. प्रतिभा देसाई यांनी बेटी बचाओ अभियानाची माहिती दिली. 'स्त्री पुरुष समतेचे भान' याविषयावर डॉ. भारती पाटील यांनी मार्गदर्शन केले.

'अंधश्रध्दा आणि स्त्रिया'या विषयावर कृष्णात स्वाती यांनी प्रात्यक्षिकांसह संवाद साधला. 'स्त्रियांमधील आर्थिक साक्षरता' या विषयावर डॉ. राजन पडवळ यांनी मार्गदर्शन केले. वेगवेगळ्या बचत गटातील महिला, विद्यापीठातील अधिकारी, कर्मचारी, रोजंदारी लेखनिक महिलांनी उपस्थित होत्या. तेजस्विनी भोसले यांनी सूत्रसंचालन केले.


जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
14 MAR 2024
सकाळ

# राजर्षी शाहू संगीत रजनी आजपासून

कोल्हापूर, ता. १३ : 'शिवाजी विद्यापीठाच्या संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागातर्फे गुरुवारी आणि शुक्रवारी सायंकाळी साडेपाच वाजता पेटाळा येथील राम गणेश गडकरी सभागृहात राजर्षी शाहू संगीत रजनीचा प्रारंभ होणार आहे. या दोन दिवसीय संगीत रजनी चार सत्रांमध्ये होणार आहे. गुरुवारच्या पहिल्या सत्रामध्ये पुण्याचे कृष्णा साळुंके आणि रोहीत खवळे यांचा 'पखवाजरंग' हा पखवाजवादनाच्या जुगलबंदीचा कार्यक्रम होईल. दुसऱ्या सत्रामध्ये कोल्हापुरातील प्रसिध्द हार्मोनियम वादक पंडीत गोविंदराव टेंबे यांच्या व्यक्तिमत्वाचा शोध घेणारा 'गुणीगोविंद' कार्यक्रम होणार आहे. त्यामध्ये निर्मिति संगीताचार्य पं. सुधीर पोटे, गौरी कुलकर्णी, गौरी पाटील यांचे गायन होणार आहे. शुक्रवारच्या पहिल्या सत्रात कोल्हापुरातील नवोदित शास्त्रीय गायिका गौतमी चिपळूणकर, तर दुसऱ्या सत्रात पुणे येथील आंतरराष्ट्रीय किर्तीच्या गायिका अनुराधा कुबेर यांचे गायन होणार आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
14 MAR 2024
सकाळ

# डॉ. सागर डेळेकर यांची संचालकपदी निवड


डॉ. सागर डेळेकर

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाच्या संचालकपदी डॉ. सागर डेळेकर यांची निवड झाली. विद्यापीठाच्या एकूण अध्यापन, मूल्यमापन, संशोधन विस्तार आणि सल्लामसलत संधीची गुणवत्ता वाढीविण्यावर लक्ष केंद्रित करणे. ज्याअंतर्गत गुणवत्ता आणि सतत अपेक्षित बदल सुनिश्चित करून एनआयआरएफ, एटीएएल रँकिंग, नॅक नामांकनामध्ये सुधारणा करणे, असा या कक्षाचा उद्देश आहे. डॉ. डेळेकर सध्या रसायनशास्त्र विभागात संशोधक म्हणून कार्यरत आहे. विद्यापीठाच्या इनोव्हेशन, इनक्युबेशन आणि लिंकेजेस सेंटरच्या संचालकपदाचीही जबाबदारी त्यांच्यावर आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
14 MAR 2024
सकाळ

# 'जे. जे. स्कूल आर्किटेक्चर'च्या कुलगुरुपदी आर. के. कामत

■ सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. १३ : डॉ. होमी भाभा राज्य विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. आर. के. कामत यांच्याकडे मुंबईतील सर जे जे स्कूल ऑफ आर्टस् आर्किटेक्चर अँड डिझाइन विद्यापीठाच्या पहिल्या कुलगुरुपदाची जबाबदारी राज्य सरकारने सोपविली आहे. त्याबाबतचा आदेश शासनाने काढला आहे.

कला, वास्तुकला आणि अभिकल्प या विषयाच्या व्यापक शैक्षणिक विकासाकरिता समर्पित असलेले देशामधील हे अशाप्रकारचे एकमेव विद्यापीठ आहे. सर जे.जे. स्कूल ऑफ आर्टस् सन १८५७ मध्ये सर जमशेदजी जीजीभॉय यांच्या दातृत्वातून निर्माण झाले आहे. त्याचे विद्यापीठामध्ये रूपांतर करण्याचा प्रस्ताव विद्यापीठ अनुदान आयोगाने मागील वर्षी मान्य केला. डॉ. कामत मूळचे कोल्हापूरचे असून, ते ऑगस्ट २०२२ पासून डॉ. होमी भाभा राज्य विद्यापीठाचे पहिले कुलगुरू म्हणून कार्यरत आहेत.



" या विद्यापीठाची स्थापना शासनाचा एक महत्त्वाकांक्षी प्रकल्प आहे. याअंतर्गत आर्किटेक्चर, डिझायनिंग, आर्टस यांचे एकत्रित शिक्षण दिले जाणार आहे. त्याअनुषंगाने अभ्यासक्रमाची आखणी, अंमलबजावणी करणे यासाठी प्रयत्न करणार आहे.

**-डॉ. आर. के. कामत**, कुलगुरू

त्यापूर्वी त्यांनी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या प्रभारी कुलगुरुपदाची जबाबदारी सांभाळली आहे. शिवाजी विद्यापीठामध्ये विज्ञान व तंत्रज्ञान विभागाचे अधिष्ठाता म्हणून ते कार्यरत होते. इलेक्ट्रॉनिक्स आणि संगणकशास्त्र विभागाचे वरिष्ठ प्राध्यापक आणि विभागप्रमुख म्हणून त्यांनी काम केले आहे. त्यांच्या नावावर अनेक पेटंट आहेत.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
14 MAR 2024

सकाळ

# भित्तीचित्र स्पर्धेत दड्डुणवार प्रथम

कोल्हापूर : स्वच्छ भारत अभियान अंतर्गत महापालिकेने घेतलेल्या भित्ती चित्र स्पर्धेत राकेश दड्डुणवार यांचा प्रथम क्रमांक आला. सार्वजनिक भिंती स्वच्छ करून त्यावर कलात्मक संदेश तसेच जनजागृतीपर माहिती रेखाटून भिंती रंगवल्या जाव्यात अशा सूचना प्रशासक के. मंजुलक्ष्मी यांनी सांगितले होते. त्यानुसार केएसबीपी चौक ते सायबर चौक या रस्त्यावरील शिवाजी विद्यापीठाच्या संरक्षक भिंतीवर पर्यावरण संवर्धन, राष्ट्रीय स्वच्छ हवा कार्यक्रम, प्लास्टिक बंदी, क्रीडा विषयक जनजागृती करणारे तसेच विविध प्रेक्षणीय स्थळे यावर स्पर्धा घेतली होती. त्यातून प्रथम क्रमांक दड्डुणवार यांना (२५ हजार), द्वितीय क्रमांक अनिल कांबळे (२० हजार), तृतीय क्रमांक योगेश मोरे (१५ हजार), उत्तेजनार्थ पुष्कराज मेस्त्री, पुष्पक पांढरबळे, राजेंद्र लोहार यांना (५ हजार) जाहीर झाला.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
14 MAR 2024
तरुण भारत

# विद्यापीठात राजर्षी शाहू संगीत रजनीचे आज उद्घाटन

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागाच्या वतीने १४ मार्च रोजी सायंकाळी ५.३० वाजता 'राजर्षी शाहू संगीत रजनी"चे उद्घाटन कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते होणार आहे. हा कार्यक्रम राम गणेश गडकरी सभागृहात होणार आहे. पहिल्या सत्रात पुण्यातील कृष्णा साळुंखे व रोहित खवळे पखवाजरंग हा पखवाजवादनाच्या जुगलबंदीचा कार्यक्रम आहे. तर दुसऱ्या सत्रात कोल्हापुरातील हार्मोनियम वादक पंडीत गोविंदराव टेंबे यांच्या व्यक्तिमत्वाचा शोध घेणारा गुणीगोविंद कार्यक्रम होईल. यामध्ये पंडीत सुधीर पोटे, गौरी कुलकर्णी व गौरी पाटील यांचे गायन होणार आहे. १५ मार्च रोजी पहिल्या सत्रात शास्त्रीय गायिका गौतमी चिपळुणकर, व्दितीय सत्रात आंतरराष्ट्रीय किर्तीच्या गायिका विदुशी अनुराधा कुबेर यांच्या गायनाने संगीत रजनी कार्यक्रमाची सांगता होईल.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
14 MAR 2024
तरुण भारत

# महिलांनी आरोग्याची काळजी घ्यावी

- कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांचे आवाहन

प्रतिनिधी
कोल्हापूर

क्षेत्रामध्ये महिला अग्रेसर असून त्यांचे कार्य आदर्शवत आहे. धावपळीच्या जीवनामध्ये वावरताना महिला भगिनींनी आपल्या आरोग्याकडे प्राधान्याने लक्ष देणे आवश्यक आहे, असे आवाहन कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले.


शिवाजी विद्यापीठातील कै. श्रीमती. शारदाबाई गोविंदराव पवार अध्यासन आणि बेटी बचाओ अभियान यांच्या संयुक्त विद्यमाने आंतरराष्ट्रीय महिला दिनाच्या निमित्त राजर्षी शाहू सभागृहातील कार्यशाळेत ते बोलत होते. 'बचत गटाकडून स्वयंसहाय्यतेकडे' हा या कार्यशाळेचा विषय होता.

डॉ. प्रतिभा देसाई यांनी बेटी बचाओ अभियानाबद्दल माहिती दिली. 'स्त्री पुरुष समतेचे भान' या विषयावर डॉ. भारती पाटील यांनी मार्गदर्शन केले. 'अंधश्रध्दा आणि स्त्रिया' या विषयावर कृष्णात स्वाती यांनी प्रात्यक्षिकांसह महिलांशी संवाद साधला. 'स्त्रियांमधील आर्थिक साक्षरता' यावर डॉ. राजन पडवळ यांनी मार्गदर्शन केले. प्रास्ताविक डॉ. भारती पाटील यांनी केले. पाहुण्यांचा परिचय डॉ. पी. बी. देसाई यांनी करून दिला. सूत्रसंचालन तेजस्विनी भोसले यांनी केले. यावेळी डॉ. सुहासिनी पाटील, प्रिया देशमुख, डॉ. पी. टी. गायकवाड, सचिन कांबळे उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
14 MAR 2024
तरुण भारत

# डॉ. धनंजय सुतार यांना एक्सलंट लायब्ररियन पुरस्कार


कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या बॅरिस्टर बाळासाहेब खर्डेकर ज्ञान स्रोत केंद्राचे प्रभारी



संचालक व उपग्रंथपाल डॉ. धनंजय सुतार यांना महाराष्ट्रातील उच्च शिक्षण विभागातील ग्रंथालय व्यवसायामध्ये केलेल्या उत्कृष्ट योगदानाबद्दल 'मुकला एक्सलंट लायब्ररीन अवॉर्ड' देऊन गौरविण्यात आले. हा पुरस्कार मिळाल्याबद्दल शिवाजी विद्यापीठ प्रशासनाने डॉ. सुतार यांचे अभिनंदन केले. मुंबई विद्यापीठ येथे आयोजित महाराष्ट्र युनिव्हर्सिटी अँड कॉलेज लायब्ररीयन्सअसोसिएशन (MUCLA) यांच्यामार्फत आयोजित सातव्या राष्ट्रीय परिषदेमध्ये हा पुरस्कार डॉ. सुतार यांना डॉ. होमी भाभा स्टेट युनिव्हर्सिटी, मुंबईचे कुलगुरू डॉ. राजनीश कामत यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. प्रशस्तीपत्र व सन्मानचिन्ह असे पुरस्काराचे स्वरुप आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
14 MAR 2024
Times of India

# SUK Abuzz With Insect Display







The zoology department of SUK is hosting a unique exhibition on its campus displaying more than 2,200 samples of insects including butterflies, ants, grasshoppers, weevils, maggots, praying mantis, moths, stick insects, cockroaches etc. Also on display are the largest moth, India's smallest and largest butterflies, the state butterfly Blue Mormon etc. Meanwhile, a few environment activists have alleged that the exhibitors are violating wildlife laws as nearly 80% of the insects are protected under the Wildlife Act and killing them for display is wrong. In response, zoology department's professor Sunil Gaikwad, who is also the exhibition coordinator, said: "The specimens are compiled with the courtesy of the forest department and the Maharashtra Biodiversity Board. These samples have been preserved over the past 25 years. The insects were not killed for this exhibition."

14 MAR 2024
पुण्यनगरी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# अन्नसाखळीमध्ये कीटकांचे महत्त्व अनन्यसाधारण

## कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के : कीटक प्रदर्शनाचे विद्यापीठात उद्घाटन

कोल्हापूर : प्रतिनिधी

जैविक अन्नसाखळीमध्ये कीटकांचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. या कीटकांच्या प्रदर्शनाच्या आयोजनामुळे विद्यापीठाच्या नॉलेज टुरिझममध्ये प्राणिशास्त्र अधिविभागाने महत्त्वाची भर घातली आहे, असे मत कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांनी व्यक्त केले. शिवाजी विद्यापीठाच्या प्राणिशास्त्र अधिविभागातर्फे आयोजित तीनदिवसीय कीटक प्रदर्शनाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते.

प्राणिशास्त्र अधिविभागातर्फे विविध संशोधनांतर्गत वेळोवेळी कीटकांच्या प्रजातींचे नमुने संकलित करण्यात आले आहेत. हे नमुने अभ्यासासाठी जतन केले आहेत. बातीलच निवडक २२०० कीटकांचे प्रदर्शन भरवण्यात आले आहे. यामध्ये रंगीबेरंगी फुलपाखरांसह काटीकिडे, टोळ, नाकतोडे, भुंगे, मक्षिका, चतुर, किरकिरे, प्रार्थना कीटक, झुरळ आदी कीटकांच्या विविध प्रजाती व प्रकार पाहता येणार आहेत. त्याखेरीज सर्वात मोठा पतंग, भारतातील सर्वात मोठे आणि सर्वात लहान फुलपाखरू तसेच ब्ल्यू मॉरमॉन हे राज्य फुलपाखरू पाहण्याची संधीही उपलब्ध झाली आहे.

यावेळी कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, 'जगा आणि जगू द्या' हे तत्त्व कीटकांच्या बाबतीत मानवाने अवलंबले पाहिजे. कीटकांचे अस्तित्व राहिले, तरच मानवाचे अस्तित्व अबाधित राहणार आहे, याची जाणीव करून देणारे हे प्रदर्शन आहे.

यावेळी प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांच्यासह कुलसचिव डॉ. विलास शिंदे, डॉ. श्रीकृष्ण महाजन, डॉ. महादेव देशमुख, डॉ. एस. बी. खरबडे, सिद्धार्थ शिंदे, इनोव्हेशन, डॉ. सागर डेळेकर, डॉ. नितीन कांबळे, डॉ. शिवानंद यन्कंची, डॉ. माधव भिलावे उपस्थित होते. प्रास्ताविक डॉ. माधुरी वाळवेकर यांनी केले, तर अधिविभागप्रमुख डॉ. आशीष देशमुख यांनी आभार मानले.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात आयोजित कीटक प्रदर्शनाची कुतूहलाने पाहणी करणाऱ्या विद्यार्थिनी.

### कीटकांना पाहून आश्चर्य आणि नवलाई

प्रदर्शन पाहताना विद्यार्थ्यांसह नागरिकांतून आश्चर्य आणि नवलाई ओसंडून वाहत होती. माहिती असणाऱ्या मोजक्या कीटकांकडे कौतुकाने पाहताना माहिती नसणाऱ्या कीटकांकडेही चिकित्सक नवलाईच्या दृष्टीने पाहणारे प्रेक्षक दिसून येत होते. प्राणिशास्त्र अधिविभागाने माहिती देण्यासाठी संशोधक विद्यार्थ्यांची नियुक्ती केली होती.

### पृथ्वीवर ८० टक्क्यांहून अधिक कीटक

पृथ्वीवरील एकूण प्राणिमात्रांमध्ये कीटकांचे प्रमाण ८० टक्क्यांहून अधिक आहे. कीटकांच्या अंदाजे १ कोटी प्रजाती असून, त्यातील अवघ्या १० लाखच मानवाला माहीत आहेत. [illegible] हा सर्वात मोठा कीटक असून, तो या प्रदर्शनात मांडला आहे. एक मधमाशी एका दिवसात किमान ५००० फुलांना भेट देते. [illegible] दुसऱ्या [illegible] शकतो. [illegible] ठेवण्याची आणि [illegible] करण्याची [illegible] मिलनोपरांत [illegible] अंड्यांसाठी [illegible] अशी माहिती [illegible] डॉ. सुनील गायकवाड यांनी दिली.

जनसंपर्क कक्ष
14 MAR 2024
सकाळ
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# कीटकांना पाहून आश्चर्य, नवलाई

## देशातील सर्वात मोठे, तसेच लहान फुलपाखरू पाहण्याची संधी

■ सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. १३ : शिवाजी विद्यापीठातील प्राणीशास्त्र अधिविभागाने विविध संशोधनांतर्गत वेळोवेळी वेगवेगळ्या कीटकांच्या प्रजातींचे नमुने वन विभाग आणि महाराष्ट्र जैवविविधता मंडळाच्या सौजन्याने संकलित केले आहेत. त्यातील निवडक २२०० कीटकांचे तीनदिवसीय प्रदर्शन विद्यापीठात सुरू झाले. प्रदर्शन पाहताना विद्यार्थ्यांसह नागरिकांत आश्चर्य आणि नवलाई ओसंडून वाहात होती.

या प्रदर्शनाचे उद्घाटन कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते झाले. जैविक अन्नसाखळीमध्ये कीटकांचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. या कीटकांच्या प्रदर्शनाच्या आयोजनामुळे विद्यापीठाच्या नॉलेज टुरिझममध्ये प्राणीशास्त्र अधिविभागाने महत्त्वाची भर घातली आहे, असे त्यांनी व्यक्त केले. प्रदर्शनात रंगीबेरंगी फुलपाखरांसह काटीकिडे, टोळ, नाकतोडे, भुंगे, मक्षिका, चतुर, किरकिरे, प्रार्थना कीटक, झुरळ आदी कीटकांच्या विविध प्रजाती व प्रकार आहेत. त्याखेरीज सर्वात मोठा पतंग, भारतातील सर्वात मोठे आणि सर्वात लहान फुलपाखरू तसेच 'ब्लू मॉरमॉन' हे राज्य फुलपाखरू आहेत.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात आयोजित कीटक प्रदर्शनाची डॉ. सुनील गायकवाड यांच्याकडून माहिती घेताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्यासह मान्यवर.

प्राणीशास्त्र अधिविभागाने आपल्या संशोधक विद्यार्थी-विद्यार्थिनींची माहिती देण्यासाठी नियुक्ती केली होती. माधुरी वाळवेकर यांनी प्रास्ताविक केले. अधिविभागप्रमुख डॉ. आशिष देशमुख यांनी आभार मानले.

**'मधमाशी संपल्यास माणूस केवळ चार वर्षे जगेल'**

'आईनस्टाईन यांनी म्हटले आहे, 'ज्यावेळी या पृथ्वीवरील अखेरची मधमाशी नाहीशी होईल, तेथून पुढे माणूस केवळ चार वर्षे जगू शकेल.' परागीभवनाच्या प्रक्रियेमुळे अन्ननिर्मितीमध्ये मधमाश्या अत्यंत मोलाची भूमिका बजावतात,' असे प्रदर्शनाचे समन्वयक डॉ. सुनील गायकवाड यांनी सांगितले. पृथ्वीवरील एकूण प्राणीमात्रांमध्ये कीटकांचे प्रमाण ८० टक्क्यांहून अधिक आहे. एटलास मॉथ हा सर्वात मोठा कीटक असून, तो या प्रदर्शनात आहे. एक मधमाशी एका दिवसात किमान १००० फुलांना भेट देते. प्रवासी टोळ हा एका खंडापासून दुसऱ्या खंडापर्यंतचा पल्ला पार करू शकतो. सिकॅडा हा कीटक १७ वर्षांपर्यंत जगू शकतो. कुंभार माशीकडे अन्न जतन करून ठेवण्याची कला असते. प्रार्थना कीटक मीलनोपरांत नरास खाऊन टाकून आपल्या अंड्यांसाठीच्या प्रथिनांची गरज भागविते, असे त्यांनी सांगितले.

14 MAR 2024

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात 'बचत गटांकडून स्वयंसहाय्यतेकडे' या विषयावरील कार्यशाळा घेण्यात आली.

# महिलांनी आरोग्याकडे प्राधान्याने लक्ष देणे आवश्यक : कुलगुरू शिर्के

## विद्यापीठात शारदाबाई पवार अध्यासनातर्फे कार्यशाळा

कोल्हापूर, ता. १३ : 'सर्व क्षेत्रांमध्ये महिला अग्रेसर असून, त्यांचे कार्य आदर्शवत आहे. धावपळीच्या जीवनामध्ये वावरताना महिला-भगिनींनी आपल्या आरोग्याकडे प्राधान्याने लक्ष देणे आवश्यक आहे,' असे प्रतिपादन कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले.

शिवाजी विद्यापीठातील श्रीमती शारदाबाई गोविंदराव पवार अध्यासन आणि बेटी बचाओ अभियानातर्फे राजर्षी शाहू सभागृहामध्ये आयोजित 'बचत गटांकडून स्वयंसहाय्यतेकडे' या विषयावरील कार्यशाळेत ते बोलत होते. वित्त व लेखाधिकारी डॉ. सुहासिनी पाटील, वित्त विभागाच्या उपकुलसचिव प्रिया देशमुख, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. पी. टी. गायकवाड, 'माविम'चे जिल्हा समन्वय अधिकारी सचिन कांबळे प्रमुख उपस्थित होते. या अध्यासनाच्या समन्वयक प्रा. डॉ. भारती पाटील यांनी प्रास्ताविक केले.

दरम्यान, या कार्यशाळेत डॉ. प्रतिभा देसाई यांनी बेटी बचाओ अभियानाची माहिती दिली. 'स्त्री पुरुष समतेचे भान' याविषयावर डॉ. भारती पाटील यांनी मार्गदर्शन केले.

'अंधश्रध्दा आणि स्त्रिया'या विषयावर कृष्णात स्वाती यांनी प्रात्यक्षिकांसह संवाद साधला. 'स्त्रियांमधील आर्थिक साक्षरता' या विषयावर डॉ. राजन पडवळ यांनी मार्गदर्शन केले. वेगवेगळ्या बचत गटातील महिला, विद्यापीठातील अधिकारी, कर्मचारी, रोजंदारी लेखनिक महिलांनी उपस्थित होत्या. तेजस्विनी भोसले यांनी सूत्रसंचालन केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
14 MAR 2024
सकाळ

# राजर्षी शाहू संगीत रजनी आजपासून

कोल्हापूर, ता. १३ : 'शिवाजी विद्यापीठाच्या संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागातर्फे गुरुवारी आणि शुक्रवारी सायंकाळी साडेपाच वाजता पेटाळा येथील राम गणेश गडकरी सभागृहात राजर्षी शाहू संगीत रजनीचा प्रारंभ होणार आहे. या दोन दिवसीय संगीत रजनी चार सत्रांमध्ये होणार आहे. गुरुवारच्या पहिल्या सत्रामध्ये पुण्याचे कृष्णा साळुंके आणि रोहीत खवळे यांचा 'पखवाजरंग' हा पखवाजवादनाच्या जुगलबंदीचा कार्यक्रम होईल. दुसऱ्या सत्रामध्ये कोल्हापुरातील प्रसिध्द हार्मोनियम वादक पंडीत गोविंदराव टेंबे यांच्या व्यक्तिमत्वाचा शोध घेणारा 'गुणीगोविंद' कार्यक्रम होणार आहे. त्यामध्ये निर्मिति संगीताचार्य पं. सुधीर पोटे, गौरी कुलकर्णी, गौरी पाटील यांचे गायन होणार आहे. शुक्रवारच्या पहिल्या सत्रात कोल्हापुरातील नवोदित शास्त्रीय गायिका गौतमी चिपळूणकर, तर दुसऱ्या सत्रात पुणे येथील आंतरराष्ट्रीय किर्तीच्या गायिका अनुराधा कुबेर यांचे गायन होणार आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
14 MAR 2024
सकाळ

# डॉ. सागर डेळेकर यांची संचालकपदी निवड



डॉ. सागर डेळेकर

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाच्या संचालकपदी डॉ. सागर डेळेकर यांची निवड झाली. विद्यापीठाच्या एकूण अध्यापन, मूल्यमापन, संशोधन विस्तार आणि सल्लामसलत संधीची गुणवत्ता वाढीविण्यावर लक्ष केंद्रित करणे. ज्याअंतर्गत गुणवत्ता आणि सतत अपेक्षित बदल सुनिश्चित करून एनआयआरएफ, एटीएएल रँकिंग, नॅक नामांकनामध्ये सुधारणा करणे, असा या कक्षाचा उद्देश आहे. डॉ. डेळेकर सध्या रसायनशास्त्र विभागात संशोधक म्हणून कार्यरत आहे. विद्यापीठाच्या इनोव्हेशन, इनक्युबेशन आणि लिंकेजेस सेंटरच्या संचालकपदाचीही जबाबदारी त्यांच्यावर आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
14 MAR 2024
सकाळ

# 'जे. जे. स्कूल आर्किटेक्चर'च्या कुलगुरुपदी आर. के. कामत

■ सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. १३ : डॉ. होमी भाभा राज्य विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. आर. के. कामत यांच्याकडे मुंबईतील सर जे जे स्कूल ऑफ आर्टस् आर्किटेक्चर अँड डिझाइन विद्यापीठाच्या पहिल्या कुलगुरुपदाची जबाबदारी राज्य सरकारने सोपविली आहे. त्याबाबतचा आदेश शासनाने काढला आहे.

कला, वास्तुकला आणि अभिकल्प या विषयाच्या व्यापक शैक्षणिक विकासाकरिता समर्पित असलेले देशामधील हे अशाप्रकारचे एकमेव विद्यापीठ आहे. सर जे.जे. स्कूल ऑफ आर्टस् सन १८५७ मध्ये सर जमशेदजी जीजीभॉय यांच्या दातृत्वातून निर्माण झाले आहे. त्याचे विद्यापीठामध्ये रूपांतर करण्याचा प्रस्ताव विद्यापीठ अनुदान आयोगाने मागील वर्षी मान्य केला. डॉ. कामत मूळचे कोल्हापूरचे असून, ते ऑगस्ट २०२२ पासून डॉ. होमी भाभा राज्य विद्यापीठाचे पहिले कुलगुरू म्हणून कार्यरत आहेत.



" या विद्यापीठाची स्थापना शासनाचा एक महत्त्वाकांक्षी प्रकल्प आहे. याअंतर्गत आर्किटेक्चर, डिझायनिंग, आर्टस यांचे एकत्रित शिक्षण दिले जाणार आहे. त्याअनुषंगाने अभ्यासक्रमाची आखणी, अंमलबजावणी करणे यासाठी प्रयत्न करणार आहे.
**-डॉ. आर. के. कामत**, कुलगुरू

त्यापूर्वी त्यांनी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या प्रभारी कुलगुरुपदाची जबाबदारी सांभाळली आहे. शिवाजी विद्यापीठामध्ये विज्ञान व तंत्रज्ञान विभागाचे अधिष्ठाता म्हणून ते कार्यरत होते. इलेक्ट्रॉनिक्स आणि संगणकशास्त्र विभागाचे वरिष्ठ प्राध्यापक आणि विभागप्रमुख म्हणून त्यांनी काम केले आहे. त्यांच्या नावावर अनेक पेटंट आहेत.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
14 MAR 2024

सकाळ

# भित्तीचित्र स्पर्धेत दड्डुणवार प्रथम

कोल्हापूर : स्वच्छ भारत अभियान अंतर्गत महापालिकेने घेतलेल्या भित्ती चित्र स्पर्धेत राकेश दड्डुणवार यांचा प्रथम क्रमांक आला. सार्वजनिक भिंती स्वच्छ करून त्यावर कलात्मक संदेश तसेच जनजागृतीपर माहिती रेखाटून भिंती रंगवल्या जाव्यात अशा सूचना प्रशासक के. मंजुलक्ष्मी यांनी सांगितले होते. त्यानुसार केएसबीपी चौक ते सायबर चौक या रस्त्यावरील शिवाजी विद्यापीठाच्या संरक्षक भिंतीवर पर्यावरण संवर्धन, राष्ट्रीय स्वच्छ हवा कार्यक्रम, प्लास्टिक बंदी, क्रीडा विषयक जनजागृती करणारे तसेच विविध प्रेक्षणीय स्थळे यावर स्पर्धा घेतली होती. त्यातून प्रथम क्रमांक दड्डुणवार यांना (२५ हजार), द्वितीय क्रमांक अनिल कांबळे (२० हजार), तृतीय क्रमांक योगेश मोरे (१५ हजार), उत्तेजनार्थ पुष्कराज मेस्त्री, पुष्पक पांढरबळे, राजेंद्र लोहार यांना (५ हजार) जाहीर झाला.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
14 MAR 2024
तरुण भारत

# विद्यापीठात राजर्षी शाहू संगीत रजनीचे आज उद्घाटन

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागाच्या वतीने १४ मार्च रोजी सायंकाळी ५.३० वाजता 'राजर्षी शाहू संगीत रजनी"चे उद्घाटन कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते होणार आहे. हा कार्यक्रम राम गणेश गडकरी सभागृहात होणार आहे. पहिल्या सत्रात पुण्यातील कृष्णा साळुंखे व रोहित खवळे पखवाजरंग हा पखवाजवादनाच्या जुगलबंदीचा कार्यक्रम आहे. तर दुसऱ्या सत्रात कोल्हापुरातील हार्मोनियम वादक पंडीत गोविंदराव टेंबे यांच्या व्यक्तिमत्वाचा शोध घेणारा गुणीगोविंद कार्यक्रम होईल. यामध्ये पंडीत सुधीर पोटे, गौरी कुलकर्णी व गौरी पाटील यांचे गायन होणार आहे. १५ मार्च रोजी पहिल्या सत्रात शास्त्रीय गायिका गौतमी चिपळुणकर, व्दितीय सत्रात आंतरराष्ट्रीय किर्तीच्या गायिका विदुषी अनुराधा कुबेर यांच्या गायनाने संगीत रजनी कार्यक्रमाची सांगता होईल.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
14 MAR 2024
तरुण भारत

# महिलांनी आरोग्याची काळजी घ्यावी

■ कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांचे आवाहन

प्रतिनिधी
कोल्हापूर

क्षेत्रामध्ये महिला अग्रेसर असून त्यांचे कार्य आदर्शवत आहे. धावपळीच्या जीवनामध्ये वावरताना महिला भगिनींनी आपल्या आरोग्याकडे प्राधान्याने लक्ष देणे आवश्यक आहे, असे आवाहन कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले.


शिवाजी विद्यापीठातील कै. श्रीमती. शारदाबाई गोविंदराव पवार अध्यासन आणि बेटी बचाओ अभियान यांच्या संयुक्त विद्यमाने आंतरराष्ट्रीय महिला दिनाच्या निमित्त राजर्षी शाहू सभागृहातील कार्यशाळेत ते बोलत होते. 'बचत गटाकडून स्वयंसहाय्यतेकडे' हा या कार्यशाळेचा विषय होता.

डॉ. प्रतिभा देसाई यांनी बेटी बचाओ अभियानाबद्दल माहिती दिली. 'स्त्री पुरुष समतेचे भान' या विषयावर डॉ. भारती पाटील यांनी मार्गदर्शन केले. 'अंधश्रध्दा आणि स्त्रिया' या विषयावर कृष्णात स्वाती यांनी प्रात्यक्षिकांसह महिलांशी संवाद साधला. 'स्त्रियांमधील आर्थिक साक्षरता' यावर डॉ. राजन पडवळ यांनी मार्गदर्शन केले. प्रास्ताविक डॉ. भारती पाटील यांनी केले. पाहुण्यांचा परिचय डॉ. पी. बी. देसाई यांनी करून दिला. सूत्रसंचालन तेजस्विनी भोसले यांनी केले. यावेळी डॉ. सुहासिनी पाटील, प्रिया देशमुख, डॉ. पी. टी. गायकवाड, सचिन कांबळे उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
14 MAR 2024
तरुण भारत

# डॉ. धनंजय सुतार यांना एक्सलंट लायब्ररियन पुरस्कार

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या बॅरिस्टर बाळासाहेब खर्डेकर ज्ञान स्रोत केंद्राचे प्रभारी




संचालक व उपग्रंथपाल डॉ. धनंजय सुतार यांना महाराष्ट्रातील उच्च शिक्षण विभागातील ग्रंथालय व्यवसायामध्ये केलेल्या उत्कृष्ट योगदानाबद्दल 'मुकला एक्सलंट लायब्ररीन अवॉर्ड' देऊन गौरविण्यात आले. हा पुरस्कार मिळाल्याबद्दल शिवाजी विद्यापीठ प्रशासनाने डॉ. सुतार यांचे अभिनंदन केले. मुंबई विद्यापीठ येथे आयोजित महाराष्ट्र युनिव्हर्सिटी अँड कॉलेज लायब्ररीयन्सअसोसिएशन (MUCLA) यांच्यामार्फत आयोजित सातव्या राष्ट्रीय परिषदेमध्ये हा पुरस्कार डॉ. सुतार यांना डॉ. होमी भाभा स्टेट युनिव्हर्सिटी, मुंबईचे कुलगुरू डॉ. राजनीश कामत यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. प्रशस्तीपत्र व सन्मानचिन्ह असे पुरस्काराचे स्वरुप आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
14 MAR 2024

Times of India

# SUK Abuzz With Insect Display







The zoology department of SUK is hosting a unique exhibition on its campus displaying more than 2,200 samples of insects including butterflies, ants, grasshoppers, weevils, maggots, praying mantis, moths, stick insects, cockroaches etc. Also on display are the largest moth, India's smallest and largest butterflies, the state butterfly Blue Mormon etc. Meanwhile, a few environment activists have alleged that the exhibitors are violating wildlife laws as nearly 80% of the insects are protected under the Wildlife Act and killing them for display is wrong. In response, zoology department's professor Sunil Gaikwad, who is also the exhibition coordinator, said: "The specimens are compiled with the courtesy of the forest department and the Maharashtra Biodiversity Board. These samples have been preserved over the past 25 years. The insects were not killed for this exhibition."